# Sale Notice

**HYBRO FOODS PRIVATE LIMITED (IN LIQUIDATION)**
**Liquidator: Roshen Chordiya**

Liquidator Address: 114, Solaris Hubtown, Near East-West Flyover, Andheri (E), Mumbai (M.H.)
Email: cirp.hybrofoods@gmail.com
Mob.- 7000911711

**E-Auction**

Sale of Assets under Insolvency and Bankruptcy Code, 2016

**Date and Time of E-Auction: 7th July at 3.00 pm to 4.00 pm**

**Last date of EMD Submission : 5th July 2025**

(With unlimited extension of 5 minutes each)

Dates for submission of eligibility documents by prospective bidder : 5th July 2025

Sale of Assets and Properties owned by **HYBRO FOODS PRIVATE LIMITED (IN LIQUIDATION)** forming part of Liquidation Estate formed by the Liquidator, appointed by the Hon'ble National Company Law Tribunal, Mumbai Bench vide order dated 27 March 2025 (order communicated on 29 March 2025). The sale will be done by the undersigned through the e-auction platform www.baanknet.com

INR.

| Asset | Block | Reserve Price | EMD Amount | Incremental Value |
|---|---|---|---|---|
| **Plant & Machinery** (Including scrap furniture and metal items) **at** Survey No. 246, Village - Lahe, Taluka - Shahapur, Dist - Thane, Maharashtra – 421601 | A | **561000** | **56100** | **10000** |
| **Vehicles at Yeola,** Dist. Nashik (M.H.) Tata Truck - MH04GF3771, Tata Truck - MH04HD9036, Tata Truck - MH04HD9037 | B | **579500** | **57950** | **10000** |

**Previous Auction created for this assets (Vide Auction ID 884 & 885) has been cancelled.**

**The E-Auction will be conducted on AS IS WHERE IS, AS IS WHAT IS, WHATEVER THERE IS BASIS and WITHOUT RECOURSE BASIS through the service provider i.e. www.baanknet.com.**

**Prospective bidders shall submit an undertaking that they do not suffer from any ineligibility under section 29A of the Code to the extent applicable and that if found ineligible at any stage, the earnest money deposited shall be forfeited.**

**Prospective Bidders shall submit the requisite documents, including a declaration of eligibility under Section 29A of the Insolvency and Bankruptcy Code through the electronic auction platform only. •**

**Prospective bidders shall deposit the Earnest Money Deposit (EMD) through the Baanknet auction platform**





**Sd/-**
**Roshen Chordiya**
**As Liquidator of Hybro Foods Private Limited**
**Vide NCLT order dated 27.03.25**
**Address: 114, Solaris Hubtown,N. S. Phadke Marg, Near East West Flyover, Andheri (E), Mumbai-400069;**
**Email: cirp.hybrofoods@gmail.com**
**IBBI Registration No.: IBBI/IPA-001/IP-P02840/2023-2024/14347**
**AFA valid till 31st December 2025**

**Date: 26/06/2025**
**Place: Mumbai** **Contact No.: 7000911711**

पान १ वरून...

## त्रिभाषा सूत्रावर सरकार ठाम!

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० आधार घेत राज्य सरकारने इयत्ता पहिलीपासून अभ्यासक्रमात तृतीय भाषा म्हणून हिंदी अनिवार्य करण्याचा निर्णय घेतला होता. सरकारकडून अप्रत्यक्षपणे हिंदीचीच सक्ती होणार असल्याने महाराष्ट्र नवनिर्माण सेना, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), काँग्रेससह विविध शैक्षणिक व सामाजिक संघटनांनी हिंदी सक्तीला विरोध केला आहे. या पार्श्वभूमीवर मंत्री भुसे यांनी मंत्रालयात पत्रकार परिषद घेऊन तृतीय भाषेविषयीची भूमिका स्पष्ट केली. राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार कोणतीही एक तृतीय भाषा स्वीकारण्याचे सरकारवर बंधनकारक नाही.

**तृतीय भाषेचे पुस्तक छापलेले नाही! :** पहिलीपासून हिंदी भाषा शिकविणार असल्याने बाजारात त्यासंदर्भात पुस्तके उपलब्ध असल्याची चर्चा सुरू आहे. मात्र, आताच्या घडीला जी पुस्तके बाजारात उपलब्ध आहेत, ती सालाबादप्रमाणे सुरू असलेल्या हिंदी माध्यमांच्या शाळांसाठी ती पुस्तके आहेत. तृतीय भाषेसंदर्भात सरकारने निर्णय केला आणि त्याप्रमाणे बालभारतीने नवीन पुस्तके बाजारात आणली आहेत असे झालेले नाही. मात्र, हिंदी भाषेबाबत शासन निर्णय केला होता तेव्हा प्रारूप पुस्तक तयार केले होते. पण स्थगिती दिल्यानंतर नवीन पुस्तक तयार केलेले नाही. तसेच शिक्षकांसाठी जी पुस्तके तयार करणार आहोत, तीसुद्धा अजून छापलेली नाहीत, असेही मंत्री भुसे यांनी स्पष्ट केले.

## ‘विरोध पाहता दबाव टाकणे अयोग्य’

टाकणे योग्य नाही, असे त्यांनी सांगितले. येवला तालुक्यातील अंदरसूल शाळेत मुली जापनीज भाषेत बोलत होत्या. मात्र, त्या मराठी शाळेत शिकत आहेत. आम्ही सर्वांना विश्वासात घेऊन हिंदी सक्ती विषयी अंतिम निर्णय घेऊ, असे त्यांनी सांगितले. हिंदीच्या प्रश्नापेक्षा इतर प्रश्न देखील महत्त्वाचे आहेत. शिक्षणमंत्री दादा भुसे हिंदी प्रश्नावर राज ठाकरे यांना भेटले आहेत. तसेच अनेक नेत्यांना देखील जाऊन भेटत असल्याचे मंत्री भुजबळ यांनी सांगितले. मनसे प्रमुख यांच्या हिंदी सक्ती आंदोलनाबाबत बोलताना मंत्री भुजबळ म्हणाले की, ते आंदोलन करताहेत आनंदाची गोष्ट आहे. व्यक्ती स्वातंत्र्य आहे. सरकारच्या कानावर हिंदी बाबत टाकलेले आहे. अनेक संस्था, शिक्षण तज्ज्ञ, तसेच अनेक वर्तमानपत्र यामध्ये लेख छापून आले आहेत. अनेक तज्ज्ञांचे मतही तेच आहे. पहिलीपासून हिंदी लादणे योग्य नाही, असे भुजबळ यांनी सांगितले.

## घोषणापत्र स्वाक्षरीस भारताचा नकार

स्वरूपातील दहशतवादाशी लढण्याचा निर्धार पुन्हा व्यक्त केला. त्यांनी दहशतवादाच्या प्रत्येक कृत्याला, त्याचा हेतू कोणताही असो, ते कुठेही, केव्हाही आणि कोणीही केले असले तरी, गुन्हेगारी आणि अन्यायकारक ठरवले. संरक्षण मंत्री, एससीओचे सरचिटणीस, एससीओच्या प्रादेशिक दहशतवादविरोधी संरचनेचे संचालक आणि इतर प्रतिष्ठित प्रतिनिधींना संबोधित करताना राजनाथ सिंह म्हणाले की, या प्रदेशासमोरील सर्वात मोठी आव्हाने शांतता, सुरक्षा आणि विश्वासाच्या कमतरतेशी संबंधित आहेत आणि वाढता कट्टरतावाद, अतिरेकीपणा आणि दहशतवाद या समस्यांचे मूळ कारण आहे.

# पहिली गुणवत्ता यादी आता ३० जूनला

## अकरावी प्रवेश : गोंधळाची मालिका सुरूच

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

इयत्ता अकरावी प्रवेशपरीक्षेचा सावळ्या गोंधळाची मालिका थांबण्याचे नाव नाही. पहिल्या वेळापत्रकानुसार पहिली सर्वसाधारण गुणवत्ता यादी गुरुवारी (दि. २६) जाहीर होणार होती. मात्र, तांत्रिक कारणांनी ती जाहीर होऊ शकली नसल्याचे शिक्षण विभागाकडून सांगण्यात आले. आता सोमवारी ३० जून रोजी पहिली गुणवत्ता यादी जाहीर होणार आहे.

इयत्ता अकरावीसाठी संपूर्ण राज्यात यंदा केंद्रीय प्रवेशप्रक्रिया राबवली जात आहे. त्याचे नियोजन नसल्याने पहिल्यांदा विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागला. वेबसाईट ठप्प होणे, वारंवार वेळापत्रक बदलणे आदी आव्हानातून अखेर विद्यार्थ्यांनी अर्ज भरले खरे मात्र पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार गुरुवारी (दि. २६) शिक्षण विभागाकडून जाहीर होणारी पहिली सर्वसाधारण गुणवत्ता यादी प्रसिद्ध करण्यास शिक्षण विभाग असमर्थ ठरला. त्यामुळे यादी प्रतीक्षा करणाऱ्या विद्यार्थ्यांना पुन्हा एकदा मनस्तापाला सामोरे जावे लागले. गेल्या आठवड्यापासून विद्यार्थी गुणवत्ता यादीची प्रतीक्षा करत होते. मात्र, गुरुवारी रात्री उशिरापर्यंत शिक्षण विभागाकडून यादी जाहीर होऊ शकली नाही.

### विद्यार्थ्यांची घोर निराशा

आधीच विविध कारणांमुळे व अडचणीमुळे गोंधळात सापडलेल्या अकरावी प्रवेशप्रक्रियेत पहिल्याच यादीला नवीन तारीख जाहीर करण्याची नामुष्की शिक्षण विभागावर ओढावली आहे. दरम्यान, तांत्रिक कारणांमुळे गुरुवारी (दि.२६) प्रसिद्ध होणारी पहिली सर्वसाधारण गुणवत्ता यादी आता सोमवारी (दि.३०) जाहीर केली जाणार असल्याची माहिती पुणे येथील शिक्षण संचालनालयाच्या सूत्रांनी दिली. यामुळे विद्यार्थ्यांची घोर निराशा झाली आहे.

## इस्लामिक नूतन वर्षास प्रारंभ

**जुने नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

इस्लामिक कालगणनेतील वर्षातील शेवटचा महिना असलेल्या ‘जिलहज्ज’ची गुरुवारी (दि.२६) २९ तारीख होती. सायंकाळी चंद्रदर्शनानंतर १४४७ हिजरी वर्ष सुरू झाले. ‘मोहर्रम’च्या १ तारखेने शुक्रवारी (दि.२७)पासून इस्लामिक नूतन वर्षाला सुरुवात होत आहे. मोहर्रमच्या दहा दिवसांना धार्मिक महत्त्व आहे.

मोहर्रम हा इस्लामिक कालगणनेतील पहिला महिना मानला जातो. हजरत इमाम हसन, हजरत इमाम हुसेन तसेच कर्बलातील शहिदांच्या स्मृतिप्रीत्यर्थ या महिन्यात धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. इमाम अहमद रजा चौक कोकणीपुरा येथे हजरत ए अकदस मौलाना मोहम्मद हनिफ कानपुरी, नानावली मशिदीत हजरत ए अकदस अल्लामा मौलाना शाकीर रझा आणि शाह हुसैनी चौकात इमाम साहब किब्ला सय्यद, हजरत मुर्तुजा अली चौक नायकवाडीपुरा येथे सुन्नी दावते इस्लामीचे समीर रजा कादरी यांच्या प्रवचनाचे आयोजन करण्यात आले आहे. शाह सादिक अकादमी कोकणीपुरा यांनीन नायकवाडीपुरा येथे कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.




इगतपुरी : कसारा घाटात आडवा झालेला कंटेनर. (छाया : वाल्मीक गवांदे)

## जुन्या कसारा घाटात तीन तास वाहतूक ठप्प

**इगतपुरी : पुढारी वृत्तसेवा**

मुंबई - नाशिक महामार्गावरील जुन्या कसारा घाटात कंटेनरच्या अपघातामुळे गुरुवारी (दि. २६) सकाळी मोठा वाहतूक खोळंबा निर्माण झाला. या अपघातामुळे महामार्गावरील वाहतूक तब्बल तीन तास ठप्प होती.

मुंबईहून नाशिककडे येणारा कंटेनर सकाळच्या सुमारास कसारा घाटात अचानक बंद पडला. त्याच दरम्यान पाठीमागून आलेल्या दुसऱ्या कंटेनरने त्याला जोरदार धडक दिली. या धडकेत पहिला कंटेनर रस्त्यावर आडवा झाला आणि संपूर्ण घाटातील वाहतूक ठप्प झाली. घटनेची माहिती मिळताच महामार्ग सुरक्षा विभागाचे पोलिस निरीक्षक राम व्होंडे यांच्या नेतृत्वाखालील पथक इगतपुरी हायवे प्रायव्हेट लिमिटेडचे कर्मचारी आणि इतर प्रशासनाचे अधिकारी घटनास्थळी पोहोचले. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी जुन्या कसारा घाटातील वाहतूक तात्पुरती नवीन घाटामार्गावर वळविण्यात आली. यानंतर क्रेनच्या मदतीने आडवा झालेला कंटेनर रस्त्यावरून हटवण्यात आला आणि वाहतूक सुरळीत करण्यात आली. मात्र या अपघातामुळे वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला.



धुळे : मुंबई-आग्रा महामार्गावरील देवभाने गावाजवळ मुंबईकडून इंदोरला जाणाऱ्या आराम बसला अचानक लागलेली आग.

## धुळ्याजवळ आराम बस खाक

**धुळे : पुढारी वृत्तसेवा**

मुंबई-आग्रा महामार्गावरील देवभाने गावाजवळ मुंबईकडून इंदोरला जाणाऱ्या आराम बसला अचानक आग लागली. मात्र, चालकाच्या प्रसंगावधानाने बसमधील सर्व ३६ प्रवाशांना तत्काळ सुखरूपपणे बाहेर काढण्यात आल्याने सर्व प्रवासी सुरक्षित बचावले. मात्र, काही वेळातच बस पूर्णपणे आगीच्या भक्ष्यस्थानी गेली.

मुंबईकडून इंदोरकडे जाणारी डॉल्फिन ट्रॅव्हल्सची (एम.पी. ०९ बी. जे. ५५४४) ही आराम बस सकाळी देवभाने फाट्याजवळ पोहोचली असता अचानक गाडीमधून धूर निघत असल्याची बाब चालक जावेद खान यांच्या निदर्शनास आली. त्यांनी तातडीने गाडी बाजूला घेत बसमधील झोपेत असलेल्या प्रवाशांना खाली उतरविले.

त्यानंतर काही क्षणात बस पूर्णपणे आगीने वेढली. माहिती मिळताच धुळे येथील अग्निशमन पथकाने धाव घेत मदतकार्य केले. मात्र, तोपर्यंत बस पूर्णपणे खाक झाली होती. यामुळे महामार्गावरील एका बाजूची रहदारीदेखील काही वेळ दुसऱ्या बाजूने वळवण्यात आली होती.

## भिंत कोसळून जेसीबी ५० फूट खोल दरीत

**चापडगाव : पुढारी वृत्तसेवा**

परिसरात रस्त्याचे काम सुरू असताना रस्त्याचा भराव अचानक कोसळल्यामुळे जेसीबी दरीत कोसळला. त्यात चालक जखमी झाला असून, त्याला उपचारांसाठी खासगी रुग्णालयात हलविण्यात आले.

सिन्नर-चापडगाव रस्त्यावर दोन वर्षांपूर्वी पेट्रोलपंपाजवळ रस्त्याला संरक्षक भिंत बांधण्यात आली होती. ठेकेदारामार्फत गुरुवारी (दि.२६) रस्त्यावर भराव टाकण्याचे काम सुरू होते. अशातच भिंत कोसळली. त्यामुळे चालकासह जेसीबी ५० फूट खोल दरीत कोसळला. आसपासच्या नागरिकांनी धाव घेत जेसीबी चालकाला उपचारांसाठी हलविले. दरम्यान, गेल्या दोन वर्षांपूर्वी बांधलेल्या संरक्षक भिंतीला ठेकेदाराकडून आता भराव टाकला जात होता. संरक्षक भिंतदेखील निकृष्ट दर्जाची बांधण्यात आली होती. त्यामुळेच ती कोसळली व हा अपघात घडला, असा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

## जि. प. निवडणुकीची धास्ती; आमदारांकडून पत्रांचा पाऊस

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे आदेश दिल्यानंतर निवडणूक आयोगाने रखडलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुका घेण्याची तयारी सुरू केली आहे. ऑक्टोबर महिन्यात निवडणुका होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे जि.प. सदस्य, पदाधिकारी येतील, पदाधिकारी आल्यास निधीचे नियोजन होईल अन् आपल्याला निधी मिळणार नाही. या भीतीपोटी आमदारांकडून कामांसाठी जिल्हा परिषदेत पत्रांचा पाऊस पडला आहे.

साडेतीन वर्षांपासून जिल्हा परिषदेत प्रशासकीय राजवट आहे. गटांना सदस्य नसल्याने कामांसाठी पत्र देता येत नाही. यामुळे विविध विभागांतर्गत निधीचे नियोजन करून कामांचे वाटप प्रशासनाकडून होत आहे. सदस्य नसल्याने आमदार गटासह तालुक्यात कामांसाठी पत्र देऊन सेससह विविध निधीतून विकासकामे करत आहेक. प्रशासनही आमदारांच्या मागणी पत्रावर विकासकामे मंजूर करत आहेत. या मंजूर कामांचे आमदारही धूमधडाक्यात उद्‌घाटन करत, विकासकामे करत असल्याचे मतदारसंघात दाखवत आहे. त्यामुळे दोन ते तीन वर्षांपासून आमदारांचे चांगभलं सुरू आहे. परंतु, न्यायालयाच्या आदेशानंतर रखडलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकांचा मार्ग खुला झाला आहे. निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार, गट व गणरचनेचे काम सुरू झाले आहे. यामुळे सप्टेंबर, ऑक्टोबर महिन्यात निवडणुका होतील, असा अंदाज वर्तविला जात आहे. या वेळात निवडणुका झाल्यास सदस्य, पदाधिकारी पदभार घेतील. कामकाजाला सुरुवात करतील. जि. प. अंतर्गत विविध विभागांतील निधीचे नियोजन करतील. त्यामुळे आपल्याला निधी मिळणार नाही या भीतीने आमदारांनी जिल्हा परिषद प्रशासनाकडे कामांसाठी पत्र देण्यास सुरुवात केली आहे. प्रशासनाकडे १०० हून अधिक पत्र प्राप्त झाल्याचे बोलले जात आहे.


### विक्री सूचना
### हायब्रो फूड्स प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनात)

परिसमापक : रोशन चोरडिया

परिसमापकांचा पत्ता : ११४, सोलारिस हबटाऊन, पूर्व - पश्चिम उड्डाणपुलाजवळ, अंधेरी (पू.), मुंबई (महा.)

ई-मेल : cirp.hybrofoods@gmail.com | मो. - ७०००९११७११

**ई-लिलाव**

इन्सॉल्व्हन्सी ॲन्ड बँकरप्ट्सी कोड २०१६ अंतर्गत संपत्तीची विक्री

**ई-लिलाव दिनांक व वेळ : ०७ जुलै, २०२५ रोजी दु. ३.०० ते दु. ४.००**

**इरठे सादरीकरणाचा शेवटचा दिवस : दि. ०५ जुलै, २०२५**

(प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह)

प्रस्तावित बोलीदारांद्वारे पात्रता दस्तावेज सादरीकरण दिनांक : ०५ जुलै, २०२५

सन्माननीय राष्ट्रीय कंपनी विधि न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांच्याद्वारे आदेश दि. २७.०३.२०२५ (आदेश कळविण्याचा दिनांक २९.०३.२०२५) अंतर्गत नियुक्त परिसमापकांद्वारे संस्थापित परिसमापन संपत्तीचा भाग असलेल्या **हायब्रो फूड्स प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनात)**च्या मालकीच्या मालमत्ता आणि संपत्तीची विक्री. ही विक्री खाली स्वाक्षरी करणारे यांच्यामार्फत ई-लिलाव प्लॅटफॉर्म www.baanknet.com यांच्याद्वारे करण्यात येणार आहे.

भारतीय रु.

| संपत्ती | ब्लॉक | राखीव मूल्य | इरठे रक्कम | विस्तार मूल्य |
|---|---|---|---|---|
| **प्लान्ट व मशिनरी** (स्क्रॅप फर्निचर व मेटल बाबी समाविष्ट) पत्ता सर्व्हे क्र. २४६, गाव लाहे, तालुका शहापूर,जिल्हा ठाणे, महाराष्ट्र - ४२१ ६०१. | अ | ५६१००० | ५६१०० | १०००० |
| **येवला येथील वाहने,** जिल्हा नाशिक (एम.एच.) टाटा ट्रक-एमएच०४जीएफ३७७१, टाटा ट्रक - एमएच०४एचडी९०३६, टाटा ट्रक - एमएच०४एचडी९०३७ | ब | ५७९५०० | ५७९५० | १०००० |

सदर संपत्तीकरिता निर्मित पूर्वीचा लिलाव (ऑक्शन आयडी ८८४ व ८८५ अंतर्गत) रद्द करण्यात आला आहे. ई-लिलाव जशी आहे, जेथे आहे, जी काही आहे तेथे आहे तत्त्वावर व विना अडथळा तत्त्वावर सेवा प्रदाते अर्थात www.baanknet.com या माध्यमातून आयोजित करण्यात येईल. प्रस्तावित बोलीदारांनी लागू असल्यानुसार कोडच्या अनुच्छेद २९ए अंतर्गत कोणतीही अपात्रता नसल्यासंदर्भात अनुबंध सादर करावा लागेल व कोणत्याही टप्प्यावर ते अपात्र आढळून आल्यास, जमा केलेली इसारा रक्कम जप्त करण्यात येईल. प्रस्तावित बोलीदारांनी केवळ इलेक्ट्रॉनिक लिलाव प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून आवश्यक दस्तावेज सादर करावेत, यामध्ये इन्सॉल्व्हन्सी ॲन्ड बँकरप्ट्सी कोडच्या अनुच्छेद २९ए अंतर्गत पात्रतेचे घोषणापत्र समाविष्ट असेल. प्रस्तावित बोलीदारांनी बँकनेट ऑक्शन प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून इसारा रक्कम ठेव (इरठे) सादर करावी.

सही/-

दिनांक : २६.०६.२०२५ रोशन चोरडिया

ठिकाण : मुंबई अवसायक हायब्रो फूड्स प्रायव्हेट लिमिटेड

एनसीएलटी आदेश दिनांक २७.०३.२०२५

पत्ता : ११४, सोलॅरिस हबटाऊन, एन.एस. फडके मार्ग, पूर्व पश्चिम उड्डाणपुलाजवळ, अंधेरी(पू), मुंबई-४०००६९

ई-मेल : cirp.hybrofoods@gmail.com

आयबीबीआय नोंदणी क्र. : IBBI/IPA-001/IP-P02840/2023-2024/14347

एएफए ३१.१२.२०२५ पर्यंत वैध

संपर्क : ७०००९११७११



### केद्राई देवस्थान (ट्रस्ट) विश्वस्त मंडळ
खडकओझर, ता. चांदवड, जि. नाशिक (रजि. नं. ए/८५१)

### जाहीर नोटीस

तमाम केद्राई देवस्थान पंचक्रोशीतील नागरिकांना या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, सालाबादाप्रमाणे २०२५-२०२६ या वर्षाकरिता श्री केद्राई देवस्थान खडकओझर, ता. चांदवड, जि. नाशिक न्यास नोंदणी क्र. अ-८५१ नाशिक सदर न्यासाचेवतीने **जुलै २०२५ ते जून २०२६** या कालावधीकरिता **पुजारी, न्हावी, मुलानी आणि भक्तनिवास** यासाठी निविदा मागविण्यात येत आहेत. **सदर निविदा पुजारीसाठी किमान रक्कम रुपये १०,००,०००/-, न्हावीसाठी किमान रक्कम रुपये ३,००,०००/- आणि मुलानी करिता किमान रक्कम रुपये ३,६५,०००/- आणि भक्तनिवास चालविण्याकरिता किमान रक्कम रुपये २,००,०००/- च्या पुढे** निविदा मागविण्यात येत आहेत.

सदर निविदा भरणेकरिता विहित नमुन्यातील अर्ज **गुरुवार दि. २६/०६/२०२५ पासून दिवाणी व फौजदारी न्यायालय, चांदवड** येथे उपलब्ध आहेत. सदर निविदा अर्ज सीलबंद करून **गुरुवार दि.२६/०६/२०२५ रोजी सकाळी११.०० वाजल्यापासून ते गुरुवार दि.०३/०७/२०२५ रोजी सायंकाळी ५.००वाजेपावेतो** दिवाणी व फौजदारी न्यायालय, चांदवड, ता. चांदवड, जि. नाशिक येथे जमा करावेत.

सदर निविदा अर्ज **शुक्रवार दि. ०४/०७/२०२५ रोजी दुपारी ०४.०० वाजता** दिवाणी व फौजदारी न्यायालय, चांदवड येथे मा. दिवाणी न्यायाधीश सो. चांदवड तथा अध्यक्ष, केद्राई देवस्थान, खडकओझर तसेच उपाध्यक्ष मा. उपअभियंता, सार्व. बांध. विभाग, चांदवड, विश्वस्त मा. तहसीलदार सो. कोषाध्यक्ष मा. सहा. पोलीस निरीक्षक, वडनेर भैरव पो. स्टे., ता. चांदवड व इतर विश्वस्त यांचे समोर उघडून जाहीर करण्यात येतील. याची नोंद घ्यावी.

**स्थळ : दिवाणी व फौजदारी न्यायालय, चांदवड, जि. नाशिक.** (शिक्का)

सही/- **( एस. एस. छल्लाणी) अध्यक्ष,** केद्राई देवस्थान (ट्रस्ट) विश्वस्त मंडळ, खडकओझर तथा दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, चांदवड


पान १ वरून...

## पाझर तलावात तरुणाचा बुडून मृत्यू

देसले, तालुका पोलिस निरीक्षक मृदुला नाईक, पोलिसपाटील संजय चव्हाण, हवालदार वाजे, शीतल गायकवाड आदींनी घटनास्थळी धाव घेतली. आपत्ती व्यवस्थापन टीमने तलावात त्याचा शोध सुरू केला. रात्री पाऊस व परिसरातील अंधार यामुळे शोधकार्यात अडथळा आला. मृतदेह मिळत नसल्याने संतप्त नातेवाइकांनी मध्यरात्री नाशिक-मुंबई महामार्गावर रास्ता रोको आंदोलन केले. परंतु पोलिसांनी समजूत काढल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले. गुरुवारी स्कुबा डायव्हर गोविंद तुपे व गणेशगाव येथील युवकांना दुपारी १२ ला मृतदेह सापडला. याप्रकरणी तालुका पोलिस ठाणे येथे अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

**मदतीसाठी दिंडी सोडून आला :** गोविंद तुपे हा स्कुबा डायव्हर आहे. त्याच्याकडे सर्व किट आहे. नाशिक तालुक्यात कुठेही अशी घटना घडल्यास त्याची मदत घेतली जाते. तुपे हा अहिल्यानगरजवळ दिंडीत सहभागी झालेला होता. बुधवारी रात्री निरोप मिळताच तो त्वरित निघुन सकाळी विल्होळीत पोहोचला आणि त्याने दुपारी मृतदेह शोधून काढला.

## पावसाळी अधिवेशन ३० जूनपासून

पक्षांचे नेते बैठकीस उपस्थित होते. विधिमंडळ सचिव जितेंद्र भोळे यांनी अधिवेशन कामकाजाची माहिती दिली. राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या आखणीची प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यामुळे या निवडणुका डोळ्यासमोर ठेवत यंदाच्या अधिवेशनात सत्ताधारी आणि विरोधी बाकांवरून विषयांची मोर्चेबांधणी केली जाण्याची शक्यता आहे. शालेय शिक्षणातील भाषेचे धोरण, महामार्ग प्रकल्पांमधील भूसंपादन, शेतकरी विषयक योजना आणि कर्जमाफीची अंमलबजावणी हे काही महत्त्वाचे मुद्दे चर्चेत येण्याची शक्यता आहे. याशिवाय पावसाळ्याशी संबंधित तयारी, पूरनियंत्रण, पीक विमा आदी विषयांवरही चर्चा होणार आहे.

## ट्रकने तीन महिलांना चांदवडमध्ये उडविले

याचवेळी मुंबई-आग्रा महामार्ग ओलांडत असताना मनमाडकडून मालेगावकडे वळण घेत असलेल्या ट्रकने सुशीला पहाडे, अनिता पहाडे व गुणमाला पहाडे यांना समोरून जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात गुणमाला पहाडे यांच्या अंगावरून ट्रक गेल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. तर सुशीला पहाडे यांच्या पायावरून चाक गेले, तर अनिता पहाडे यांना किरकोळ दुखापत झाली आहे. अपघातग्रस्तांना चांदवड बाजार समिती संचालक वाल्मीक वानखेडे, पोलिस निरीक्षक कैलास वाघ, डॉ. सतीश गांगुर्डे, डॉ. भालचंद्र पवार यांनी मदतकार्य करत उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. तर माजी नगराध्यक्ष भूषण कासलीवाल यांनी रुग्णालयात जाऊन अपघातग्रस्तांची चौकशी केली. अधिक तपास पोलिस निरीक्षक कैलास वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार स्वप्नील जाधव करीत आहेत.

## शुभांशू यांनी रचला इतिहास

केली आहे. कारण शुभांशू शुक्ला हे अंतराळात प्रवास करणारे केवळ दुसरे भारतीय आहेत. यापूर्वी, ४० वर्षांपूर्वी १९८४ मध्ये राकेश शर्मा यांनी रशियन सोयुझ अंतराळयानातून प्रवास केला होता. याव्यतिरिक्त ‘इस्रो’ या उड्डाणाला आपल्या पहिल्या मानवरहित मोहिमेच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल म्हणून पाहात आहे, जे २०२७ मध्ये ‘गगनयान’ कार्यक्रमांतर्गत नियोजित आहे. ‘गगनयान’ या संस्कृत शब्दाचा अर्थ ‘आकाशातील वाहन’ असा होतो. प्रक्षेपणानंतर शुक्ला यांनी हिंदीत म्हटले होते, काय अप्रतिम प्रवास होता. हा केवळ माझ्या आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाच्या प्रवासाची सुरुवात नाही, तर भारताच्या मानवी अंतराळ कार्यक्रमाची सुरुवात आहे.

## सापडली १८६ दर्जाहीन औषधे!

किती रुग्णांच्या जीवाला धोका निर्माण झाला याची माहिती गोळा करण्याची कोणतीही यंत्रणा शासनस्तरावर उपलब्ध नाही. केवळ नमुने दर्जाहीन ठरल्यानंतर संबंधित कंपन्यांना त्यांचे दर्जाच्या कसोटीवर नापास झालेले उत्पादन बाजारातून मागे घेण्याशिवाय काहीच कारवाई केली जात नाही. यामुळे भारतीय औषध बाजारावर दर्जाहीन आणि बनावट औषधांची तलवार कायमस्वरूपी टांगती राहिली आहे.

गतवर्षी केंद्रीय दर्जा नियंत्रण संस्थेच्या वतीने बाजारातून गोळा केलेल्या औषधांच्या नमुन्यामध्ये ९०० औषधांचे नमुने दर्जाहीन तर सुमारे २० औषधे बनावट असल्याचे निष्पन्न झाले होते. ‘सीडीएससीओ’च्या या मोहिमेअंतर्गत प्रतिवर्षी नमुने गोळा केले जात असले तरी त्यांच्या बाजाराच्या एकूण आकारमानाच्या तुलनेत संख्या नगण्य आहे. मुळातच देशातील केंद्र व राज्य शासनाच्या अन्न व औषध प्रशासनाच्या आघाडीवर आपुर्या कर्मचार्यांच्या संख्येने ग्रासले आहे. महाराष्ट्रासारख्या प्रगत समजल्या जाणार्या राज्यात गरजेच्या तुलनेनुसार ७० टक्क्यांहून अधिक कर्मचारी वर्ग अपुरा आहे.


### पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११०१८
### स्थापत्य विभाग
### ई निविदा सूचना क्र. स्थापत्य/ ग मुख्यालय/HO/१०/०१/२०२५-२६

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून खालील नमूद केलेल्या कामासाठी ई टेडरिंग पद्धतीने परसेंट रेट निविदा मागविण्यात येत आहे.
१. निविदेचा दर भरताना एकूण निविदा रकमेतून मटेरियल टेस्टींग रक्कम वगळून आलेल्या रकमेवर निविदा दर भरावा.
२. प्रचलित दराने GST बिलात अदा केली जाईल त्यामुळे GST वगळून दर द्यावेत.
३. रॉयल्टीबाबत मनपा जे धोरण ठरवेल ते आपणांवर बंधनकारक राहील

| अ. क्र. | कामाचे नाव | एकूण निविदा रक्कम (४+६) | मटेरियल टेस्टींग रक्कम वगळून निविदा रक्कम | रॉयल्टीची रक्कम | मटेरियल टेस्टिंग चार्जेस | बयाणा रक्कम | अनामत रक्कम | कामाची मुदत (महिने) | निविदा फॉर्म फी जी.एस.टी. सह (परत न मिळणारी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| १ | प्रभाग क्र. २४ मधील सदाशिव कॉलनी, श्रीकृष्ण कॉलनी, आनंद पार्क व इतर परिसरातील रस्ते कॉंक्रीटीकरण करणे.(सन २०२४-२५ करिता) | २,०७,०७, ९२८ | २०५४३११० | ० | १,६४,८१८ | १,५०,००० | १०,३५,४०० | १८ | १५,०७५ |

**निविदेचे वेळापत्रक**

| | |
|---|---|
| ई-निविदा उपलब्ध कालावधी | दि.२७/०६/२०२५ ते दि.०४/०७/२०२५ |
| निविदा स्वीकृती अंतिम दिनांक व वेळ | दि. ०४/०७/२०२५ दुपारी ३.०० पर्यत |
| निविदापूर्व सभा दिनांक व वेळ | दि. ०२/०७/२०२५ दुपारी ३.०० पर्यत |
| निविदापूर्व सभा स्थळ | मा.शहरअभियंता पिं. चिं. मनपा. यांचे दालन |
| निविदा उघडणेचा दिनांक | दि. ०७/०७/२०२५ दुपारी ३.०० वाजता शक्य झालेस |

कोणतेही कारण न देता निविदा पूर्णतः किंवा अंशतः मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार मा. आयुक्त यांनी स्वत:कडे राखून ठेवला आहे. निविदा संचाची विक्री https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई-निविदा सूचनेत नमूद केलेल्या तारखेनुसार सुरु राहील.सविस्तर निविदा व निविदेबाबतची इतर माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे. १.https://mahatenders.gov.in

सदरची ई निविदा प्रणाली वापराबाबत काही तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास NIC यांचेकडील ई-मेल support-epro²@nic.in अथवा Help Desk Number ०१२०-४२००४६२,०१२०-४००१००२,०१२०-४००१००५,०१२०-६२७७७८७ या दूरध्वनीवर संपर्क साधावा.

सही/-
शहर अभियंता
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे-१८.

जाहिरात क्रमांक : ९२/२०२५-२६
जा.क्र. : स्था/६/कावि/०३/२०२५ दिनांक : १८/०६/२०२५
दिनांक : २६/०६/२०२५



### जाहीर नोटीस

प्रोसेस जमा नि. ६

दिवाणी चौकशी अर्ज नं. १९/२०२५

**चांदवड येथील मे. सिव्हिल जज्ज सो. ज्युनिअर डिव्हिजन सो. यांचे कोर्टात..**

**श्रीमती जिजाबाई भागीनाथ उबाळे, वय ७०, घरकाम, शेती**
रा. गंगावे, ता. चांदवड, जि. नाशिक - **अर्जदार**
ह.मु. प्लॉट नं. ४२४/२२, प्रभात को-ऑप.
हौसिंग सोसायटी, सारस्वत बँकेजवळ,
सेक्टर ४, कांदिवली (वेस्ट), मुंबई. ४०००६७

--- **विरुद्ध** ----

**कोणीही नाही** **-सा.वाले**

ज्याअर्थी, मयत शिवराम रामा उबाळे हे मौजे गंगावे, ता. चांदवड येथे मयत झालेले असून, अर्जदार ही त्यांची कायदेशीर वारस असून, त्यांना अर्जदाराशिवाय अन्य कुणीही कायदेशीर वारस नाही, असा वारस दाखला अर्जदार हिचे नावाने मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याबाबत कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी **ता. ०७/०८/२०२५** रोजी मे. कोर्टात हजर राहून हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाची हरकत न आल्यास हुजूर कोर्ट अर्जदार यांचे मागणीप्रमाणे अर्ज मंजूर करण्यात येईल.


आज दि. २६/०६/२०२५ रोजी सदर नोटीस आमचे सहीशिक्क्यानिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली असे.

सही/- **कामगिरी लिपिक** चांदवड न्यायालय (कोर्टाचा शिक्का) सही/- **सह. अधीक्षक** चांदवड न्यायालय


## ‘समृद्धी’वर अपघातात नाशिकचे व्यावसायिक ठार

**कसारा : पुढारी वृत्तसेवा**

मुंबई नागपूर समृद्धी महामार्गांवर आमणे ते इगतपुरी दरम्यान मर्सिडीज कारला आपघात होऊन नाशिक येथील व्यावसायिक सुनील गणपतराव हेकरे (वय ६२) यांचा मृत्यू झाला. मुंबईत कौटुंबिक सोहळा आटोपून परत जाताना समृद्धी महामार्गावर आमणे ते कसारा दरम्यान त्यांची मर्सिडिज कार उलटून हा अपघात झाला.



सुनील हेकरे हे मंगळवारी (दि. २४) सकाळी कुटुंबीयांसमवेत एका कौटुंबिक सोहळ्यासाठी मुंबई येथे गेले होते. तेथून परतताना आमणे ते कसारा दरम्यान त्यांच्या कारच्या बाजूने एक कार जात होती. शेजारची गाडी अतिवेगात जाताना हायवेवरील पाणी हेकरेंच्या गाडीच्या काचेवर उडाले. त्यामुळे गाडी चालवणाऱ्या अभिषेक सुनील हेकरे यांना क्षणभर काही दिसले नाही व त्यांचा गाडीवरील ताबा सुटला व गाडी पलटी झाली. या भीषण अपघातात सुनील हेकरे यांचा मृत्यू झाला, तर पत्नी सुचेता, मुलगा अभिषेक आणि करण हे तिघेही जण जखमी झाले. दरम्यान, मुंबई-नागपूर समृद्धी महामार्ग हा वाहनचालकांसाठी धोक्याचा महामार्ग ठरत असून, पंधरा दिवसांत आमणे ते इगतपुरीदरम्यान १३ अपघात होऊन ४ ते ५ जण मयत झाल्याचे समजते.

# अदानीला हाकलून देणे हाच महाराष्ट्राचा ड्रीम प्रोजेक्ट

■ मुंबई

## संजय राऊतांचा हल्लाबोल

**शक्तिपीठ** महामार्गासाठी २० हजार कोटींची मंजुरी दिल्यावरून शिवसेना ठाकरे गटाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी आज पुन्हा एकदा महायुती सरकार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लक्ष्य केले. शक्तिपीठ हा फडणवीस यांचा ड्रीम प्रोजेक्ट आहे असे सांगितले जाते. त्याचा संदर्भ देताना महाराष्ट्रासाठी खरा ड्रीम प्रोजेक्ट म्हणजे अदानीला हाकलून देणे हा आहे. फडणवीस तो पूर्ण करतील का, असा हल्लाबोल राऊत यांनी केला.

संजय राऊत म्हणाले, राज्य सरकार म्हणते की 'लाडकी बहीण' योजनेसाठी पैसे नाहीत, म्हणून ती अडचणीत येते. पण त्याच सरकारने शक्तिपीठ महामार्गासाठी २० हजार कोटी मंजूर केले. यामध्ये १० हजार कोटी रुपये ठेकेदारांमार्फत राजकीय वापरासाठी विशेषतः स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी वळवले जातील. हे प्रकल्प आपल्या लाडक्या ठेकेदारांसाठीच काढले जातात. या ठेकेदारांना आधीच आश्वासने दिली गेली असून, त्यांच्याकडून उचलेले पैसे सत्ताधाऱ्यांकडे जातात. या दलालीतून किमान ५० टक्के हिस्सा सरकारच्या लोकांकडे पोहोचतो.

शक्तिपीठ महामार्ग हा देवेंद्र फडणवीस यांना ड्रीम प्रोजेक्ट आहे. मात्र, या महाराष्ट्रातून अदानीला हाकलून देणे हाच महाराष्ट्राचा ड्रीम प्रोजेक्ट आहे. आज संपूर्ण महाराष्ट्रातील प्रकल्प, विशेषतः मुंबईतील योजना, अदानी आणि अन्य गुजराती उद्योगपतींच्या हातात सोपवल्या जात आहेत. अगदी वीज वितरणापासून ते वसुलीपर्यंत सर्वकाही त्यांच्याकडे दिले जाते.

# माऊलींच्या नामघोषात नीरा स्नान संपन्न

■ पुणे

**संत** ज्ञानेश्वर माऊलींच्या आषाढी वारीतील शाहीस्नान सोहळा आज नीरा नदीत संपन्न झाला. पुरंदर तालुक्यात दिंडीच्या विसाव्यानंतर दुपारी २ वाजताच्या सुमारास नीरा स्नानासाठी पालखी मार्गस्थ झाली. माऊलींच्या पादुका रथातून बाहेर काढून नीरा नदीवरील दत्त घाटावर आणल्या. त्यानंतर 'माऊली माऊली' असा नामघोष सुरू झाला. मंगलमय वातावरणात संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पादुकांना नीरा नदीमध्ये वारकऱ्यांनी स्नान घातले. यानंतर माऊलींना तुळशीहार अर्पण केला. या सोहळ्यानंतर माऊलींची पालखी सातारा जिल्ह्याकडे मार्गस्थ झाली.

# निवडणुकीत वाढीव मतदान! हायकोर्टाने याचिका फेटाळली

■ मुंबई

## बहुमूल्य वेळ फुकट गेल्याची कोर्टाची टिप्पणी

**गेल्यावर्षी** राज्यात पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत संध्याकाळी ६ वाजता मतदानाची वेळ संपल्यावर तब्बल ७६ लाख मते वाढल्याचा दावा करणारी याचिका मुंबई उच्च न्यायालयाने काल फेटाळून लावली आहे. न्यायमूर्ती गिरीष कुलकर्णी आणि न्यायमूर्ती आरीफ डॉक्टर यांच्या खंडपीठाने सोमवारी राखून ठेवलेला आपला निकाल बुधवारी जाहीर केला. विशेष म्हणजे, या सुनावणीवरील युक्तिवाद दिवसभर ऐकून न्यायालयाचा बहुमूल्य वेळ फुटक गेला, अशी टिप्पणी न्यायालयाने आपल्या निकालात केली आहे.

विक्रोळीतील चेतन अहिरे यांनी यासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. यावर न्यायमूर्ती गिरीष कुलकर्णी आणि न्यायमूर्ती आरीफ डॉक्टर यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. चेतन अहिरे यांच्यावतीने ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी बाजू मांडली होती. प्रकाश आंबेडकर यांनी युक्तिवाद करताना एकंदरीत निवडणूक प्रक्रियेवर जोरदार आक्षेप घेतला होता. ईव्हीएम मशीन आल्यापासूनच आपल्या निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकतेचा अभाव असल्याचा आरोप त्यांनी केला होता. या याचिकेला निवडणूक आयोग, केंद्र सरकारकडून जोरदार विरोध करण्यात आला. याचिकाकर्ते अशाप्रकारे संपूर्ण निवडणूक प्रक्रियेवर सवाल उपस्थित करत न्यायालयात दाद मागूच शकत नाहीत. यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश स्पष्ट आहेत. त्यामुळे ही याचिका फेटाळून लावावी, असे निवडणूक आयोगातर्फे ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ आशुतोष कुंभकोणी आणि केंद्र सरकारतर्फे डॉ. उदय वारूंजीकर यांनी स्पष्ट केले.

यावर न्यायालयाने २७ पानी निकाल जाहीर केला. त्यामध्ये न्यायालयाने स्पष्ट केले की, संध्याकाळी ६ नंतर मतदान झाल्याचे वृत्त एका वर्तमानपत्राने दिले. त्या आधारावर ही याचिका करण्यात आली होती. या मतदानाची ठोस कागदपत्रे सादर केली नाहीत. राजकीय मते व एका वृत्ताच्या आधारे निवडणूक आयोगाला माहिती सादर करण्याचे आदेश देता येणार नाहीत. तसेच मतदानात अनुचित प्रकार घडल्याची कोणतीही माहिती सादर केलेली नाही. त्यामुळे बोगस मतदान झाले हे ओळखणे कठीण आहे, असे निरीक्षण नोंदवीत न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावली.

# विद्यार्थ्यांनी काढली अंमली पदार्थ विरोधी जनजागृती रॅली

■ मुंबई

**जागतिक** अंमली पदार्थ विरोधी दिनाचे औचित्य साधून आज ना. म. जोशी मार्ग पोलीस ठाणे हद्दीतील पीपल एज्युकेशन सोसायटीच्या महाराष्ट्र हायस्कूल यांच्यावतीने विद्यार्थ्यांसह एक जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचे नेतृत्व शाळेच्या मुख्याध्यापिका मानसी राणे यांनी केले. त्यांच्यासोबत शिक्षक वर्ग तसेच सुमारे ११५ विद्यार्थी मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते. रॅलीस ना. म. जोशी मार्ग पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद चंदनशिवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी व अंमलदारांनी देखील साथ दिली. रॅली दरम्यान विद्यार्थ्यांनी हातात फलक घेऊन Say No to Drugs, Drugs Destroy Lives, Be Smart - Don't Start अशा घोषवाक्यांच्या माध्यमातून प्रभावी संदेश दिला.



हा उपक्रम केवळ शालेय विद्यार्थ्यांपुरता मर्यादित न राहता, समाजात अंमली पदार्थांच्या विरोधात सजगता निर्माण करणारा ठरला. पोलीस व शाळा यांच्यातील हे सशक्त सहकार्य समाजहितासाठी एक सकारात्मक पाऊल मानले जात आहे.

# भारताची ऐतिहासिक भरारी! शुक्ला अंतराळ स्थानकात

पान १ वरून

दिवस रोमांचक असतील. जय हिंद, जय भारत.

ॲक्सियम मिशन-४ अंतर्गत काल दुपारी वाजता अमेरिका, हंगेरी, पोलंडच्या अंतराळयात्रींसह भारताचे शुभांशू शुक्ला हेदेखील अंतराळात रवाना झाले होते. त्यांच्या कॅप्सुल यानाला आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर पोहोचायला २८ तास लागणार होते. नियोजित वेळापत्रकानुसार संध्याकाळी साडेचार वाजता ते तिथे पोहोचणार होते. परंतु ते दुपारी ४.०० वाजता म्हणजे अर्धा तास आधीच आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर पोहोचले. हे डॉकिंगचे थेट प्रक्षेपण पाहायला शुभांशूचे आईवडील उपस्थित होते. शुभांशू आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर पोहोचताच त्यांनी आनंद साजरा केला. शुभांशू आता १४ दिवस अंतराळ स्थानकावर राहणार आहेत. ते या काळात विविध प्रयोग करणार आहेत.

आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर पोहोचण्याच्या आधी शुभांशू यांनी अंतराळातून पृथ्वीवर लाईव्ह संवाद साधला. यात ते म्हणाले की, अंतराळातून नमस्कार! माझ्या सहकारी अंतराळवीरांसोबत इथे येणे हे रोमांचकारी आहे. काल मी ३० दिवसांच्या क्वारंटाईननंतर लॉन्चपॅडवरील कॅप्सूलमध्ये बसलो होतो तेव्हा आपल्याला फक्त जायचे आहे, एवढाच विचार माझ्या मनात होता. पण जेव्हा राईड सुरू झाली तेव्हा असे वाटले की, तुम्ही सीटवर मागे ढकलले जात आहात. ती एक अद्भूत राईड होती आणि मग अचानक सर्व काही शांत झाले. शांततेच्या पोकळीत तुम्ही तरंगत असता. या प्रवासात माझ्याबरोबर असलेल्या सर्वांचे मी आभार मानू इच्छितो. की ही एकट्यादुकट्याची कामगिरी नाही, तर हे सर्वांचे सामूहिक यश आहे.

मी तुम्हा सर्वांचे मनापासून आभार मानू इच्छितो. कुटुंब आणि मित्रांचाही पाठिंबा खूप महत्त्वाचा आहे. तुमच्या सर्वांमुळे हे सर्व शक्य झाले आहे. आम्ही व्हॅक्यूममध्ये प्रवेश केला तेव्हा मला सुरुवातीला फारसे चांगले वाटत नाही. पण कालपासून मला सांगण्यात आले आहे की, मी खूप झोपलो होतो. हे एक चांगले लक्षण आहे.

मी या वातावरणाशी चांगल्या प्रकारे जुळवून घेत आहे. देखाव्यांचा आनंद लुटत आहे. हा संपूर्ण अनुभव आनंददायी आहे. हे एखाद्या लहान मुलासारखे शिकणे आहे. नवीन पावले, चालणे, स्वतःवर नियंत्रण ठेवणे, खाणे, सर्वकाही. हे एक नवीन वातावरण आहे, नवीन आव्हान आहे आणि मी माझ्या सहकारी अंतराळवीरांसोबत हा अनुभव खूप एन्जॉय करत आहे.

# डोंबिवलीत भाजपाचे नेते विकास म्हात्रेंचा राजीनामा

■ कल्याण

**डोंबिवलीतील** भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि माजी स्थायी समिती सभापती विकास म्हात्रे आणि त्यांच्या पत्नी माजी नगरसेविका कविता म्हात्रे यांनी भारतीय जनता पक्षाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. स्थानिक नेतृत्त्वाकडून सहकार्य व निधी अभावामुळे त्यांनी हा निर्णय घेतल्याचे सांगितले जात आहे.

म्हात्रे दाम्पत्याने याआधीही पक्षाचा राजीनामा देऊ केला होता. मात्र आमदार रवींद्र चव्हाण यांच्या मध्यस्थीनंतर त्यांनी निर्णय मागे घेतला होता. पण यावेळी त्यांनी थेट भाजपाचे जिल्हाध्यक्ष नंदकुमार परब यांच्याकडे राजीनामा सादर केला.

या राजीनाम्यामुळे डोंबिवलीत भाजपामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अंतर्गत मतभेद उफाळून येत असल्याची चर्चा रंगली आहे.

# देशात ३६२५ कोरोना रुग्ण! महाराष्ट्रात तिघांचा मृत्यू

■ नवी दिल्ली

**भारतात** कोरोना रुग्णांमध्ये घट झाली झाली आहे. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने जारी केलेल्या आकडेवारीनुसार देशात कोरोनाचे ३६२५ सक्रिय रुग्ण आहेत. तर आतापर्यंत २२,९१५ कोरोना रुग्ण बरे झाले आहेत. महाराष्ट्रात कोरोनामुळे तिघांचा मृत्यू झाला आहे. ज्यामध्ये साताऱ्यातील एक आणि नागपूरमधील दोन रुग्णांचा समावेश आहे. आता पर्यंत देशात १३१ जणांचा मृत्यू झाला आहे.



केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या आकडेवारी नुसार, केरळमध्ये सक्रिय रुग्णांची संख्या सर्वाधिक आहे. केरळ मध्ये ७५० सक्रिय रुग्ण आहेत तर आज एका ८२ वर्षीय महिलेचा मृत्यू झाला. पश्चिम बंगालमध्ये ७४७ सक्रिय रुग्ण आहेत, दिल्लीमध्ये ४३५ सक्रिय रुग्ण आहेत. महाराष्ट्र २२३ सक्रिय रुग्ण आहेत तर गेलात २४ तासात ३ तिघांचा मृत्यू झाला. त्यांना इतर आजार होते. गुजरात ३५७,उत्तर प्रदेश १५९, राजस्थान १५६, मणिपूर १५२, कर्नाटक १४१, तामिळनाडू १०२, छत्तीसगड ५३, पंजाब ५२, हरियाणा ६४, मध्य प्रदेश ७१, जम्मू आणि काश्मीर २७, सिक्कीम आणि आसाममध्ये प्रत्येकी २५, आंध्र प्रदेश ३०, बिहार १०, झारखंड ८ सक्रिय रुग्ण आहेत. मिझोरम, लडाख आणि हिमाचल प्रदेश, अरुणाचल प्रदेशात एकही सक्रिय रुग्ण नाही.

# ८ वीच्या विद्यार्थ्याकडून १० वीच्या विद्यार्थ्याची हत्या

**अहिल्यानगर-** अहिल्यानगरमध्ये आठवीत शिकणाऱ्या विद्यार्थ्याने दहावीच्या विद्यार्थ्याची चाकूने भोसकून हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. दोघेही एकाच शाळेत शिकत असून, एकाच परिसरातील रहिवासी आहेत. क्रिकेटच्या कारणावरून दोघांमध्ये वाद झाला होता. आज शाळेतील जेवणाच्या सुट्टीत दोघांमध्ये पुन्हा एकदा भांडण झाले. या वादात आठवीतील विद्यार्थ्याने दहावीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यावर चाकूने हल्ला केला. या हल्ल्यात दहावीचा विद्यार्थी गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने जिल्हा शासकीय रुग्णालयात नेण्यात आले, मात्र उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी आठवीच्या विद्यार्थ्याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

# भविष्यात वीजदरात आणखी घट होणार

■ मुंबई

## लोकेश चंद्र यांचे प्रतिपादन

**मुख्यमंत्री** देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महावितरणने गेल्या अडीच वर्षात राज्याच्या वीजपुरवठ्यासाठी केलेल्या नियोजनामुळे आगामी पाच वर्षांत कंपनीची वीज खरेदी खर्चात ६६ हजार कोटी रुपयांची बचत होणार असल्याने त्याचा लाभ वीज ग्राहकांना देऊन आगामी पाच वर्षांसाठी वीजदरात कपात करता आली. महावितरणने नवीकरणीय ऊर्जेवर भर दिला असून त्यांचे वीजदर कायम राहणार असल्याने पाच वर्षांनंतर वीजदरात आणखी घट होईल, असे प्रतिपादन महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी केले.

लोकेश चंद्र म्हणाले की, महाराष्ट्र राज्याची आगामी काळातील विजेची गरज ध्यानात घेऊन महावितरणने २०३४ -३५ या आर्थिक वर्षापर्यंत पुरेशा विजेसाठीचे नियोजन केले आहे. आगामी पाच वर्षांत राज्याची विजेची क्षमता ४५ हजार मेगावॅटने वाढविण्यासाठी वीजखरेदी करार केले आहेत. यामध्ये प्रामुख्याने सौर, पवन, पंप स्टोरेज, बॅटरी स्टोरेज अशा नवीकरणीय ऊर्जास्त्रोतांवर भर दिला आहे. या स्त्रोतांमधून वीज स्वस्त दरात मिळणार असल्याने कंपनीची आगामी पाच वर्षांत वीजखरेदीची ६६ हजार कोटी रुपयांची बचत होणार आहे. त्याचा लाभ घरगुती, औद्योगिक आणि व्यावसायिक ग्राहकांना वीजदर कपातीच्या स्वरुपात करून देण्यात आला आहे. यासाठी गेली अडीच वर्षे नियोजनबद्धरित्या काम सुरू होते.

# सांगली-आष्टा रस्त्यावर अपघात

## २ जण ठार

**सांगली-** भरधाव वेगाने जाणाऱ्या कारने एका दुचाकीला पाठीमागून जोरात धडक दिली. या भीषण अपघातात दुचाकीवरील दोघेजण ठार झाले. हा अपघात मिरज तालुक्यातील सांगली-आष्टा रस्त्यावर तुंग गावाजवळ मिणचे मळा परिसरात काल रात्री उशिरा झाला. या घटनेमुळे परिसरात एकच हळहळ व्यक्त होत आहे.

# पवई आयआयटीमधील घुसखोर तरुणाला अटक

**मुंबई-** पवई येथील प्रतिष्ठित भारतीय तंत्रज्ञान संस्थेत (आयआयटी) घुसखोरी करणाऱ्या बिलाल अहमद फैय्याद अहमद तेली (२२) या तरुणाला गुन्हे शाखेने अटक केली. त्याला १४ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. १७ जून रोजी तो आयआयटीच्या व्याख्यानात बेकायदेशीरपणे बसलेला आढळून आल्यावर सुरक्षा रक्षकांनी त्याला पवई पोलिसांच्या ताब्यात दिले.


**NOTICE**

**Schedule of upcoming Investor Awareness Program(s) (IAP);**

Axis Mutual Fund conducts various IAP with a view to educate and create awareness amongst the investors about the Mutual Funds.

In this regard, please see below details of upcoming of IAP:

| Date of Event | Mode of Participation (Physical / Online) | Time | Address / Link for joining webinar |
|---|---|---|---|
| 29-06-2025 | Physical | 11.00 a.m. | Prasad Food Divine, SS Business Park, Gharda Circle, Omkar Nagar, Sagarli Gaon, Dombivli East, Maharashtra - 421 302. |

For any queries/ clarifications please contact : Jasbir Singh Gidda - 95740 11119.

Date : June 26, 2025

**Mutual Fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully.**

AXIS MUTUAL FUND

One Lodha Place, 22nd & 23rd Floor, Senapati Bapat Marg, Lower Parel, Mumbai, Maharashtra, Pin Code - 400 013, India.

**TEL :** (022) 6649 6100, **EMAIL :** customerservice@axismf.com, **WEBSITE :** www.axismf.com.



पावरग्रिड POWERGRID

**सूचना**

१. वीज अधिनियम, २००३ च्या कलम ६२ सहवाचिता कलम ७९(१)(ड) आणि केंद्रीय वीज नियामक आयोग (व्यवसाय संचालन) नियमावली, २०२३ मधील नियम १५(१)(अ) आणि नियम २३ सहवाचिता केंद्रीय विद्युत नियामक आयोग (दर निर्धारणाचे अटी व शर्ती) नियमावली, २०२४ अन्वये दर निर्धारणासाठी दाखल केलेली **याचिका-१: पश्चिम क्षेत्र विस्तार योजना-३१.**

२. वरील उल्लेखित प्रसारण योजनेचे लाभार्थी पुढीलप्रमाणे आहेत: (१) मध्यप्रदेश पॉवर मॅनेजमेंट कंपनी लिमिटेड, जबलपूर (२) छत्तीसगड राज्य वीज वितरण कंपनी लिमिटेड, रायपूर (३) गुजरात ऊर्जा विकास निगम लिमिटेड, वडोदरा (४) विद्युत विभाग, गोवा शासन, पणजी (५) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड, मुंबई (६) डीएनएचडीडी पॉवर डिस्ट्रीब्युशन कॉर्पोरेशन लिमिटेड, सिल्वासा

३. दरपत्रक तपशील:

**अ) २०२४-२४ ब्लॉक** **रू.लाखात**

| याचिका क्र. | मालमत्ता वर्णन | डीओसीओ/ ईसीओडी | ३१.०३.२०२९ रोजी पूर्णतेचा खर्च | | २०२५-२६ | २०२६-२७ | २०२७-२८ | २०२८-२९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे (जीआयएस) उपकेंद्रामध्ये १X१५०० एमव्हीए, ७६५/४०० के व्ही क्षमतेचा आयसीटी (तिसरा) आणि संबंधित खाडीसह | ०१.०४.२०२५ | १०८०५.९० | एएफसी | १४७२.३७ | २०६६.८८ | २१४५.११ | २१३७.११ |

४. या सूचनेची आणि दर निश्चित करण्यासाठी केलेल्या अर्जाची प्रत अर्जदाराच्या www.powergrid.in या वेबसाइटवर पोस्ट केली आहे.

५. याचिकेत समाविष्ट असलेल्या वीज दर निश्चित करण्याच्या प्रस्तावांवर सूचना आणि आक्षेप, जर असतील तर, लाभार्थ्यांसह, कोणत्याही व्यक्तीने आयोगाच्या ई-फायलिंग पोर्टलद्वारे किंवा सचिव, केंद्रीय वीज नियामक आयोग, ६ वा, ७ वा आणि ८ वा मजला, टॉवर बी, वर्ल्ड ट्रेड सेंटर, नौरोजी नगर, नवी दिल्ली - ११००२९ (किंवा इतर पत्ता आयोगाचे कार्यालय जेथे आहे तेथे) यांच्याकडे लेखी स्वरूपात दाखल करू शकता, ज्याची प्रत ही सूचना प्रकाशित झाल्यापासून ३० दिवसांच्या आत याचिकाकर्त्याला त्याच्या कॉर्पोरेट कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवावी.

**ठिकाण: गुरुग्राम** **सही/-**

**दिनांक: २०.०६.२०२५** **उपमहाव्यवस्थापक (वाणिज्यिक)**

**पॉवर ग्रिड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड**

(भारत सरकारचा एक उपक्रम)

**नोंदणीकृत कार्यालय:** बी-९, कुतुब संस्थात्मक क्षेत्र, कटवारिया सराय, नवी दिल्ली-११००१६

**कॉर्पोरेट कार्यालय:** सौदामिनी, प्लॉट क्रमांक २, सेक्टर-२९, गुरुग्राम, हरियाणा-१२२ ००१

www.powergrid.in, CIN: L40101DL1989038121GOI038121

महारत्न पीएसयू

PG/CC/Notice-21/Advt-25/2025-26



महावितरण

## जाहीर निवेदन

बदलापूर (पू/प) / मुरबाड मधील ग्राहकांना सूचित करण्यात येते की खालील नमूद केलेल्या वाहिनीवर तांत्रीक दुरुस्तीचे काम करावयाचे असल्याने संबंधित वाहिनी दि. २७.०६.२०२५ रोजी विद्युत पूरवठा बंद राहील. ग्राहकांची होणाऱ्या गैरसोयीबद्दल महावितरण कंपनी दिलगिरी व्यक्त करीत आहे.

| क्र. | उपकेंद्र | वाहीनी | दिनांक | भागाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | २२/२२ केव्ही खरवई स्विचिंग स्टेशन | २२ केव्ही खरवई ईनकमर फिडर | १०.०० ते १५.०० (पाच तास) दि. २७.०६.२०२५ | स्टेशनपाडा, गांधी चौक, आगर आळी, खरवई, पाटील पाडा, कुळगाव शंकर मंदिर परिसर, मॉल प्लाझा, गोपाळ नगर, मनोरमा नगर, ,मानकिवली, शिरगाव, खरवई औद्योगिक क्षेत्र |
| २ | २२/२२ केव्ही पोद्दार स्विचिंग स्टेशन | २२ केव्ही पोद्दार ईनकमर फिडर | १०.०० ते १५.०० (पाच तास) दि. २७.०६.२०२५ | मानकिवली, MIDC, चाम्तोली, कासगाव,गोरेगाव, समर्थवाडी, वांगणी पूर्व व पश्चिम, कुळसावरे, दोणेवाडी, मोरेवाडी |
| ३ | २२/२२ केव्ही उमरोली सब/स्टेशन | २२ केव्ही टोकावडे फीडर | ११.०० ते १६.०० (पाच तास) दि. २७.०६.२०२५ | टोकावडे, वाशिगरे, खापरे, मानिवली |

**कार्यकारी अभियंता,**

**बदलापूर विभाग**



महावितरण

## जाहीर निवेदन

अंबरनाथ-(पू)/(प) व उल्हासनगर-४ /५ मधील ग्राहकांना सूचित करण्यांत येते की, खालील नमूद केलेल्या वाहींनीवर तांत्रिक दुरूस्तीचे काम करावयाचे असल्याने संबंधित वाहीनी दि.२७.०६.२०२५ रोजी सुचीनुसार बंद राहतील. ग्राहकांना होणाऱ्या गैरसोयीबद्दल महावितरण कंपनी दिलगीरी व्यक्त करीत आहे.

| क्र. | उपकेंद्र | वाहीनी | दिनांक व वेळ | भागाचे नांव |
|---|---|---|---|---|
| १. | १००/२२ केव्ही मोरीवली सबस्टेशन (२८६०११) | २२ केव्ही अंबरनाथ-१ फिडर नं. ३०८ | १०.०० ते १३.०० (३ तास) दि. २७.०६.२०२५ | केमीकल झोन, वडळंगाव, जसानी, उल्हासनगर ४ उपविभाग सुभाष टेकडी, लालचक्की मराठा सेक्शन, स्टेशन एरीआ, ओ.टी. सेक्शन,एएमपी गेट, साई सेक्शन, शिव मंदिर रोड,कानसई सेक्शन, भिमनगर, शिवाजी चौक, हुतात्मा चौक, कमलाकर नगर, फुले नगर, जावसई, महाराष्ट्र हौसींग बोर्ड, डिफेन्स कॉलनी, वांद्रापाडा, नेताजी मार्केट, चिंचपाडा, गांवदेवी, कोहच गाव, छाया हॉस्पिटल, वुलन चाळ, संजय नगर, विमको नाका, केटी स्टील, बेथल चर्च, पाटील प्राईड,स्टेशन रोड, भाजी मार्केट, मातोश्री नगर, जुने म्युनीसीपल कौन्सिल आणि १ नं. एच. टी. ग्राहक., अंबरनाथ पश्चिम एरिया. |
| २. | | २२ केव्ही अंबरनाथ-२ फिडर नं. ३०९ | १०.०० ते १३.०० (३ तास) दि. २७.०६.२०२५ | |
| ३. | | २२ केव्ही एमआर-३१९ अंबरनाथ -३ | १०.०० ते १३.०० (३ तास) दि. २७.०६.२०२५ | |

**Sd/-**

**कार्यकारी अभियंता**

**उल्हासनगर विभाग-२**



## नाशिक महानगरपालिका, नाशिक

**सार्वजनिक बांधकाम विभाग**

**ई-निविदा सुचना क्र. १२ (सन २०२५-२६)**

नाशिक महानगरपालिका, नाशिक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या 04 कामांची ई-निविदा सुचना क्रमांक.१२ (सन २०२५-२६) दिनांक २७/०६/२०२५ पासुन दिनांक ०४/०७/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपावेतो मा.शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिसेल. निविदा स्विकृतीची अंतिम दिनांक ०४/०७/२०२५ राहील.

**टीप** - यापुढील सर्व आवश्यक सुचना / शुध्दीपत्रक हे Online website वर प्रसिध्द करणेत येतील.

**Sd xxx** **शहर अभियंता** **नाशिक महानगरपालिका, नाशिक**

**Sd xxx** **अति. आयुक्त (२)** **नाशिक महानगरपालिका, नाशिक**

जनसंपर्क/जा.क्र/१३५/२०२५ दि.२६/०६/२०२५ "पर्यावरण बचे, तो प्राण बचे ।"



## वाडा नगरपंचायत

**ता.वाडा, जि.पालघर**

जा.क्र. १६८८ दि. २६/०६/२०२५

**जाहीर ई-निविदा सूचना**

मुख्याधिकारी, नगरपंचायत वाडा, जिल्हा पालघर यांच्या वतीने १. **वाडा नगरपंचायत अग्निशामक सयंत्र २४ तास तीन पाळी मध्ये ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पद्धतीने चालविण्याकरिता अग्निशमन सेवार्थ (फायरमन व अग्निशमन वाहन चालक) मनुष्यबळ पुरवठा करणे करिता अभिकर्ता नेमणेबाबत २. घनकचरा व्यवस्थापन व मान्सूनपूर्व नालेसफाई साठी भाडेतत्त्वावर जे.सी.बी. व इतर वाहनांचा पुरवठा करणे (सन २०२५-२६) ३. वाडा नगरपंचायत मधील पाणीपुरवठा, स्वच्छता व कार्यालयात लागणारे कुशल, अर्धकुशल व अकुशल मनुष्यबळ पुरवठा करणे ( सन २०२५-२६)** या कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे. सर्व इच्छुक निविदाधारकांनी ई-निविदा प्रणालीच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून निविदा प्रपत्र डाऊनलोड करून संचाची किंमत व बयाना रक्कम Net Banking द्वारा Online भरावेत, ई - निविदा Online सादर करावयाची दिनांक. २७.०६.२०२५ ते दि.०४.०७.२०२५ रोजी दुपारी ३.०० वा. पर्यंत राहील.

**सही/-**

**मुख्याधिकारी**

**वाडा नगरपंचायत**



**विक्री सूचना**

**हायब्रो फूड्स प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये)**

परिसमापक: रोशन चोरडिया

परिसमापकाचा पत्ता - ११४, सोलारिस हबटाऊन, पूर्व-पश्चिम फ्लायओव्हरजवळ, अंधेरी (पू), मुंबई (एम.एच)

ईमेल: cirp.hybrofoods@gmail.com | मोबा.: ७०००९११७११

**ई-लिलाव**

नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ अन्वये संपत्तीची विक्री

**ई-लिलावाचा दिनांक आणि वेळः दि. ७ जुलै रोजी दु. ३.०० ते सायं. ४.०० पर्यंत**

**ईएमडी सादरीकरणाचा अंतिम दिनांकः दि. ५ जुलै, २०२५**

(प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह)

**संभाव्य बोलीदाराद्वारे पात्रता दस्तऐवज सादरीकरणाचा दिनांकः दि. ५ जुलै, २०२५**

माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपिठाद्वारे आदेश दिनांक २७ मार्च, २०२५ (दि. २९ मार्च, २०२५ रोजी आदेश सूचित करण्यात आला) नुसार नियुक्त परिसमापकाद्वारे स्थापित परिसमापन संपत्तीचा भाग बनलेल्या **हायब्रो फूड्स प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये)** च्या मालकीच्या संपत्ती आणि मालमत्तांची विक्री. विक्री निम्नस्वाक्षरीकारांद्वारे ई-लिलाव प्लॅटफॉर्म www.baanknet.com मार्फत करण्यात येईल.

**भारतीय रुपये**

| संपत्ती | ब्लॉक | राखीव किंमत | ईएमडी रक्कम | विस्तारयोग्य रक्कम |
|---|---|---|---|---|
| सर्व्हे क्र. २४६, गाव - लाहे, तालुका - शहापूर, जि. ठाणे, महाराष्ट्र - ४२१६०१ येथील **प्लान्ट आणि मशिनरी** (भंगार फर्निचर आणि धातूच्या वस्तू समाविष्ट) | ए | ५६१००० | ५६१०० | १०००० |
| **येवला**, जि. नाशिक (एम.एच.) **येथील वाहने** टाटा ट्रक - MH04GF3771, टाटा ट्रक - MH04HD9036, टाटा ट्रक - MH04HD9037 | बी | ५७९५०० | ५७९५० | १०००० |

**या मालमत्तेकरिता बनविलेला आधीचा लिलाव (लिलाव आयडी ८८४ आणि ८८५ नुसार) रद्द झाला आहे.**

**ई-लिलाव सेवा प्रदाता म्हणजेच www.baanknet.com मार्फत जसे आहे जेथे आहे, जसे आहे जे आहे, तेथे जे आहे तत्त्वावर आणि कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर आयोजित करण्यात येईल.**

**संभाव्य बोलीदारांनी हमीपत्र सादर करावयास हवे की, ते संकेताच्या कलम २९ए अन्वये लागू मर्यादेपर्यंत कोणत्याही अपात्रतेचा सामना करीत नाहीत आणि जर कोणत्याही टप्प्यावर अपात्र आढळल्यास, जमा केलेली इसारा रक्कम जप्त करण्यात येईल.**

**संभाव्य बोलीदारांनी नादारी आणि दिवाळखोरी संकेताच्या कलम २९ए अन्वये पात्रतेची उद्‌घोषणा समाविष्ट असलेली आवश्यक कागदपत्रे फक्त इलेक्ट्रॉनिक लिलाव प्लॅटफॉर्म द्वारे सादर करावी. संभाव्य बोलीदाराने इसारा रक्कम अनामत (ईएमडी) बँकनेट लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे जमा करावी.**

**सही/-**

**दिनांक: २६.०६.२०२५** **रोशन चोरडिया**

**ठिकाण: मुंबई** **हायब्रो फूड्स प्रायव्हेट लिमिटेडचे परिसमापक म्हणून**

एनसीएलटी आदेश दिनांक २७.०३.२५ नुसार

**पत्ता:** ११४, सोलारिस हबटाऊन, एन. एस. फडके मार्ग, पूर्व पश्चिम फ्लायओव्हरजवळ, अंधेरी (पू), मुंबई ४०००६९.

ईमेल: cirp.hybrofoods@gmail.com

**आयबीबीआय नोंदणी क्र.:** IBBI/IPA-001/IP-P02840/2023-2024/14347

**एएफए वैधता** दि. ३१ डिसेंबर, २०२५ **पर्यंत. संपर्क क्र.:** ७०००९११७११

# SALE NOTICE
# HYBRO FOODS PRIVATE LIMITED (IN LIQUIDATION)

**Liquidator : Roshen Chordiya**
**Liquidator Address: 114, Solaris Hubtown, Near East-West Flyover, Andheri (E), Mumbai (M.H.)**
**Email: cirp.hybrofoods@gmail.com I Mob.- 7000911711**

**E-Auction**

Sale of Assets under Insolvency and Bankruptcy Code, 2016

**Date and Time of E-Auction: 7th July at 3.00 pm to 4.00 pm**

**Last date of EMD Submission : 5th July 2025**

(With unlimited extension of 5 minutes each)

Dates for submission of eligibility documents by prospective bidder : 5th July 2025

Sale of Assets and Properties owned by **HYBRO FOODS PRIVATE LIMITED (IN LIQUIDATION)** forming part of Liquidation Estate formed by the Liquidator, appointed by the Hon'ble National Company Law Tribunal, Mumbai Bench vide order dated 27 March 2025 (order communicated on 29 March 2025). The sale will be done by the undersigned through the e-auction platform www.baanknet.com

**INR.**

| Asset | Block | Reserve Price | EMD Amount | Incremental Value |
|---|---|---|---|---|
| **Plant & Machinery** (Including scrap furniture and metal items) at Survey No. 246, Village - Lahe, Taluka - Shahapur, Dist - Thane, Maharashtra – 421601 | A | 561000 | 56100 | 10000 |
| **Vehicles at Yeola,** Dist. Nashik (M.H.) Tata Truck - MH04GF3771, Tata Truck - MH04HD9036, Tata Truck - MH04HD9037 | B | 579500 | 57950 | 10000 |

**Previous Auction created for this assets (Vide Auction ID 884 & 885) has been cancelled.**

**The E-Auction will be conducted on AS IS WHERE IS, AS IS WHAT IS, WHATEVER THERE IS BASIS and WITHOUT RECOURSE BASIS through the service provider i.e. www.baanknet.com.**

**Prospective bidders shall submit an undertaking that they do not suffer from any ineligibility under section 29A of the Code to the extent applicable and that if found ineligible at any stage, the earnest money deposited shall be forfeited.**

**Prospective Bidders shall submit the requisite documents, including a declaration of eligibility under Section 29A of the Insolvency and Bankruptcy Code through the electronic auction platform only. ·Prospective bidders shall deposit the Earnest Money Deposit (EMD) through the Baanknet auction platform**

**Sd/-**

**Date: 26/06/2025**
**Place: Mumbai**

**Roshen Chordiya**
**As Liquidator of Hybro Foods Private Limited**
Vide NCLT order dated 27.03.25
**Address:** 114, Solaris Hubtown,N. S. Phadke Marg, Near East West Flyover, Andheri (E), Mumbai-400069;
Email: cirp.hybrofoods@gmail.com
**IBBI Registration No.:** IBBI/IPA-001/IP-P02840/2023-2024/14347
**AFA valid till** 31st December 2025 **Contact No.:** 7000911711